# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## वनस्पतीशास्त्र विभाग

पुढारी

# राजगुरू महाविद्यालयात राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात २७ व २८ डिसेंबर असे दोनदिवसीय वनस्पतीशास्त्र विभागांतर्गत "मूलभूत व उपयोजित वनस्पतीशास्त्रातील नावीन्यपूर्ण संभावना" या विषयावर राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एच. एम. जरे व प्रबंधक के. आर. पाचारणे यांनी दिली.

या परिषदेचे उद्घाटन कांदा-लसूण संशोधन केंद्राचे संचालक डॉ. मेजर सिंग यांच्या हस्ते आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या परिषदेत राज्यातील विविध विद्यापीठ व महाविद्यालयातील डॉ. मधुकर बाचुळकर, डॉ. अविनाश आडे, डॉ. तुकाराम निकम, डॉ. बी. डी. गचांडे, डॉ. अभय साळवे आदी संशोधक, विषयतज्ज्ञ उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेत पश्चिम घाटातील जैवविविधता, प्लास्टिक विघटन करणारे सूक्ष्मजीव तसेच वनस्पतीशास्त्रातील विविध विषयांवर चर्चा होणार असून विविध महाविद्यालयातील विषयतज्ज्ञ व विद्यार्थ्यांनी यात सहभागी होण्याचे आवाहन वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. जी. एल. भोर व डॉ. के. एम. नितनवरे यांनी केले.

My Gramin Edition
25 Dec, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

# वनस्पतिशास्त्रावर राजगुरुनगरला परिषद

**राजगुरुनगर, ता. २५** सावित्रीबाई फुले पुणे विद्य हुतात्मा राजगुरू महाविद्याल संयुक्त विद्यमाने गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत शुक्रवारी (ता. २७) व शनिवारी (ता. २८) वनस्पतिशास्त्र विभागांतर्गत 'मूलभूत व उपयोजित वनस्पतिशास्त्रातील नावीन्यपूर्ण संभावना' या विषयावर राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन केल्याची माहिती प्राचार्य डॉ. एच. एम. जरे व प्रबंधक के. आर. पाचारणे यांनी दिली.

या परिषदेचे उद्‌घाटन कांदा लसूण संशोधन केंद्राचे संचालक डॉ.मेजर सिंग यांच्या हस्ते होणार आहे. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील हे अध्यक्षस्थानी आहेत. या परिषदेत राज्यातील विविध विद्यापीठांतील डॉ. मधुकर बाचुळकर, डॉ. अविनाश आडे, डॉ. तुकाराम निकम, डॉ. बी.डी. गचांडे, डॉ. अभय साळवे आदी संशोधक व विषयतज्ज्ञ उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

# राजगुरू महाविद्यालयात वनस्पतिशास्त्रावर राज्यस्तरीय परिषद

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २७ व २८ रोजी वनस्पतीशास्त्र विभागांतर्गत मूलभूत व उपयोजित वनस्पतीशास्त्रातील नाविन्यपूर्ण संभावना या विषयावर राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एच.एम.जरे व प्रबंधक के.आर.पाचारणे यांनी दिली.

या परिषदेचे उद्घाटन कांदा लसूण संशोधन केंद्राचे संचालक डॉ. मेजर सिंग यांच्या हस्ते आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या परिषदेत राज्यातील विविध विद्यापीठ व महाविद्यालयातील डॉ. मधुकर बाचुळकर, डॉ. अविनाश आडे, डॉ. तुकाराम निकम, डॉ. बी डी गचांडे, डॉ. अभय साळवे अन्य संशोधक, विषय तज्ञ उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेत पश्चिम घाटातील जैवविविधता, प्लास्टिक विघटन करणारे सूक्ष्मजीव तसेच वनस्पतीशास्त्रातील विविध विषयांवर चर्चा होणार असून विविध महाविद्यालयातील विषय तज्ञ व विद्यार्थ्यांनी यात सहभागी होण्याचे आवाहन वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा.जी.एल.भोर व डॉ. के.एम.नितनवरे यांनी केले.

जा. क्र. ११२५६/१९
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे
दि. २७-११-१९

## चौकशीची जाहीर नोटीस

चौकशी अर्ज क्रमांक ३३८/२०१९
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक : महादेव देवस्थान ट्रस्ट, पिंपरी पेंढार
श्री. राजेंद्र संतराम कुटे ----अर्जदार.

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त १, पुणे विभाग, पुणे हे वर नमूद केलेल्या चौकशी अहवाल/अर्ज यासंबंधी मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत :

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
(अ) जंगम मिळकत : रु. १०००/-
(ब) स्थावर मिळकत : (मिळकतीचे वर्णन) - गाव मौजे मु. पो. पिंपरी पेंढार, ता. जुन्नर, जि. पुणे ४१० ५०४ येथील भूमापन क्र. १०८७ ब मिळकत क्र. १२७० येथील एकूण क्षेत्रफळ १२५० चौ. फूट.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल, त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मी, सहायक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २७/११/२०१९ रोजी दिली.

(शिक्का)
अधीक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे

## जाहीर प्रसिद्ध

तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या नवीन शर्तीच्या (इनाम वर्ग ६ब) मिळकत या श्री. मिलिंद बुवा ऊर्फ बनसोडे, अशोक बुवा ऊर्फ बनसोडे, शकुंतला बुवा ऊर्फ बनसोडे यांच्या वडिलोपार्जित मालकी व ताबे - वहिवाटीच्या असून सदर मिळकती त्यांनी श्री./श्रीमती सागर सुरेश वाघमारे यांना कायम खूषखरेदी देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे. त्यानुसार त्यांनी आमचे बरोबर बोलणी चालू आहेत. सदर मिळकती पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्यास भरवसा दिलेला आहे. सदर मिळकतीवर कोणाच्याही बक्षीस, गहाण, दान, लीज, पोटगी, चोळीबांगडी, खरेदी, साठेखत, ...

दै. केसरी

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख